मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत

दाविद राजा
(भाग १)

लेखक: Edward Hughes

रेखाचित्रकार: Lazarus; Alastair Paterson

रूपान्तरकार: Ruth Klassen

अनुवादक: Rev. Shilas Gavit

निर्माता: Bible for Children
www.M1914.org

©2021 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.

तरुण दाविद पळत फिरत होता. शौल राजा त्याला जिवे मारु इच्छित होता. दाविद जंगलात आणि गुहांत त्याच्या चारशो अनुयायांसोबत राहात असे.

काही वेळा तर शौल राजाच्या सैनिकांनी त्यांना शोधूनच काढले असे व्हायचे. परंतू दाविद एकसारखा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पळत फिरत असे.

शौलाचा सेवक दवेग याने राजाला असे सांगितले की, दाविदाला पळवून लावण्यासाठी याजकांनी दाविदाची मदत केली. शौलाने त्या याजकांना मारुन टाकण्याचा आदेश दिला.

परंतू हे असे करण्यास केवळ दवेगच तयार होता ! त्याच्या तलवारीने त्याने पंचाऐंशी याजक व त्यांच्या कुटुंबाचा फार क्रूरतेने वध केला. ते फारच दुष्ट होते.

एके दिवशी, शौल दाविदाच्या शोधात असतांना एका गुहेत जिथे दाविद व त्याचे लोक लपून बसले होते तेथे सरळ आंत गेला. शौल तेथे एकटाच होता !

त्या गुहेत दाविदाने शौलाला
सहज जिवे मारले असते.
परंतु त्याऐवजी तो
हळूच त्याच्याजवळ
गेला आणि

त्याने त्याच्याजवळील धारदार चाकूने
त्याच्या झग्याचा काठ कापून घेतला.
करण्याचे विचार नाहीत..."

जेंव्हा शौल गुहेतून बाहेर गेला
तेंव्हा दाविदाने त्याला
हाक मारुन म्हटले, "मी
आपल्या झग्याचा
काठ कापून
घेतला
आहे, आणि तुम्हांला जिवे मारले नाही,
यावरुन तुम्हांला कळावे की माझ्या मनात
तुमच्या विषयी वाईट विचार किंवा तुमच्या
विरुध्द् बंड करण्याचे विचार नाहीत..."

दाविदाला मारण्याचा प्रयत्न केला त्याच्याविषयी शौलाने खेद व्यक्त केला. परंतू लवकरच त्याचा पुर्विचा राग परत आला आणि त्याने दाविदाला मारण्यासाठी तिन हजार पुरुषांचे सैन्य गोळा केले. एके रात्री जेंव्हा शौलाचे सर्व सैन्य झोपलेले होते. दाविद आणि अबीशय नावाचा दाविदाचा एक सैनिक, जेथे शौल राजा झोपलेला होता तेथे राजाच्या छावणीत शिरले.

अबीशाय हळूवार आवाजात दाविदाला म्हणाला, "देवाने आज आपला शत्रू आपल्या हाती दिला आहे. तर आता मला त्याच्या भाल्याने त्याजवर असा एकच वार करु द्या की तो त्यास भेदून जमिनी शिरेल; भाला पुनः मारण्याची जरुरच पडणार नाही."

दाविदाने शौलाला जिवे मारण्याचे
नाकारले. आणि त्याने शौलाचा
भाला व पाण्याचा चंबू घेवून ते
त्यांच्या छावणीत परतले. मग
दाविद पलीकडील बाजूस एका
दूरच्या टेकडीच्या माथ्यावर उभा
राहून शौलाला ऐकू जाईल तोवर
हाक मारत राहिला.

पुन्हा एकदा दाविद शौल राजाला
मारु शकत असतांना देखिल मारले
नाही हे दाविदाला कळून आले. पुन्हा एकदा
शौल राजाने तो दाविदाला जिवे मारु
पाहात होता त्याच्याविषयी दिलगीरी व्यक्त
केली. परंतू दाविदाला शौलाविषयी
माहिती होती, तो त्याच्या बोलण्यावर
विश्वास करु शकत नव्हता.

यावेळेपर्यंत शमुवेलाचा मृत्यू झाला होता. तो असा एक देवाचा संदेष्ट होता, ज्याला देवाने इस्त्राएलांचा राजा होण्यासाठी प्रथम शौल आणि नंतर दाविद यांना अभिषेक करण्यास सांगितले. जेंव्हा पलिष्टी लोकांनी इस्त्राएलवर हल्ला केला, तेंव्हा शौलाने असे काहीतरी भयंकर केले, जे करण्यास देवाने मनाई केलेली होती.

मेलेल्या लोकांतून शमुवेलला वर बोलवावे अशी आज्ञा
त्याने एका स्त्रीला दिली. त्या रात्री, शौलाला
एक संदेश मिळाला.

"...परमेश्वर तुझा त्याग करुन तुझा शत्रु झाला आहे...परमेश्वराने तुझ्या हातुन राज्य हिसकावून घेऊन तुझा शेजारी दावीद यास दिले आहे... उद्या तूं आपल्या पुत्रांसह मजकडे येशील; परमेश्वर इस्त्राएलांचे सैन्य पलिष्ट्यांच्या हाती देईल." शौलाने जेंव्हा हे ऐकले तेंव्हा त्याच्यात काही शक्ति उरली नाही तो भयभीत होऊन खाली कोसळला.

पलिष्टी इस्त्राएलांच्या विरुध्द् लढले; तेंव्हा इस्त्राएल लोक पलिष्ट्यांपुढून पळून गेले. पलिष्ट्यांनी शौलाच्या पुत्रांना ठार मारले, त्यात दाविदाचा चांगला मित्र योनाथान देखिल मारला गेला.

तिरंदाजांनी शौलाला खूप जखमी केले होते. शौल आपल्या शस्त्रवाहकास म्हणाला, "आपली तलवार उपसून मला भोसक, तसे न केल्यास हे दुष्ट लोक येऊन मला भोसकतील व माझी विटंबना करतील." पण त्याचा शस्त्रवाहक तसे करिना; कारण तो फार घाबरला होता. तेंव्हा शौलाने स्वतःची तलवार काढून तो तिच्यावर पडला.

शौल व त्याच्या मुलांची मेलेली
देह सापडल्यावर, पलिष्ट्यांनी
काबिज केलेल्या गांवकुसावर
त्यांना टांगिले. काही शुर
इस्त्राएलींनी त्यांच्या शरीरांना
तेथून काढून आणले, व ती
प्रेते जाळली, आणि त्यांच्या
अस्थि इस्त्राएलात पुरल्या.

जेंव्हा दाविदाने हि भयंकर गोष्ट ऐकली तेंव्हा त्यांने संध्याकाळपर्यंत शौल आणि त्याचा मुलगा योनाथान, व देवाच्या लोकांसाठी उपास करुन शोक केला, कारण ते तलवारीने मारले गेले होते.

शौलाने जरी दाविदाला मारण्याचा प्रयत्न केला तरी,
अखेर पर्यंत दाविदाने शौलाला देवाने
अभिषिक्त केलेला असे मानून त्याचा
सन्मान केला.

आता परमेश्वराने दाविदाला
शौलाच्या जागी राजा करुन
दाविदाचा सन्मान केला.

दाविद राजा (भाग १)

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट घेण्यात आली आहे

१ शमुवेल २४–३१, २ शमुवेल १–२

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

समाप्त

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर ईश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची इच्छा अशी आहे की आम्ही त्याला ओळखावे.

ईश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मृत्यू आहे, पण ईश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याने तुमच्या पापांसाठी शिक्षा मिळावी आणि क्रॉसवर मरण यावे म्हणून त्याच्या एकुलत्या पुत्राला येशूला पाठविले. नंतर येशू पुन्हा जिवंत झाला आणि स्वर्गीतल्या घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

जर हे सत्य आहे यावर तुम्ही
विश्वास ठेवता, तर ईश्वराला हे सांगा:

प्रिय येशू, तू ईश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मृत्यू भोगण्यास मनुष्य बनलास आणि आता तू पुन्हा जगतोस यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांसाठी मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एक दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी निघेन. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर. आमेन.

बाइबल वाचा आणि ईश्वराशी रोज बोला!

जॉन 3:16